# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०८/०६/२०२४ (शनिवार) सायंकाळ**

---

**मौजा गोंडखैरी येथील पारधी बेडयावरील गावठी हातभट्टीच्या दारूची निर्मीती करणाऱ्या आरोपींवर कायदेशीर कारवाई**

दिनांक ०७/०६/२०२४ चे १६.३७ वा. दरम्यान मा. अनिल म्हस्के सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांना मुखबिरव्दारे मिळालेल्या माहिती वरून मौजा गोंडखैरी मोठया प्रमाणात गावठी हात भट्टीचे दारूची निर्मीती करण्यात येत आहे अशा माहितीवरून अनिल म्हस्के सहा. पोलीस अधिक्षक यांनी सोबत स्था.गु.शा. नागपूर ग्रामिण, पोलीस स्टेशन सावनेर, केळवद, खापा नागपूर ग्रमिण येथील आर.सी.पी पथक यांचे एक विशेष पथक स्थापन करून गोंडखैरी येथील पारधी बेडयावर रेड कारवाई केली असता एकुण १२ महिला आरोपी व ०५ पुरूष आरोपी नामे– १) अवदेश पवार २) बबन दशरथ गजबे ३) श्याम कन्हैया पवार ०४) राजेन्द्र गुलाबराव गुजर ०५) प्रदिप प्रतापराव भोसले (गुड विक्रेता) सर्व रा. गोंडखैरी पारधीबेडा यांनी रनींग भटटी काढतांना मिळुन आल्याने सदर आरोपींवर कार्यवाही करून सदर प्रकरणात निळया प्लास्टिक व लोखंडी ड्रम,१०२ नग किंमत २०,४०० रूपये ,मोहाफुल सडवा २६,५०० लीटर एकुण किमती ५,३०,०००रूपये ,काळा गुळ–११६० किलो किंमती ५८,००० रू. जर्मन घमेले–५ किंमती १०००रू. गुड मोजण्याचे इलेक्ट्रीक वजन काटा किंमत १०,०००रू.मोहाफुल गावठी दारू, ६४३ लीटर किंमत ३२,१५० रू., जळाउ लाकुड, व इतर दारू गाळण्याचे साहित्य, पाईप, असा एकुण ६,५१,५५० रूपयाचा माल जप्त करून जागीच नष्ट करण्यात आला. वरील सर्व आरोपींवर मदाका कलम ६५ (b) (c )(e),)(f) अन्वये कार्यवाही करण्यात आली.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार ,अपर पोलीस अधिक्षक रमेश धुमाळ ,यांच्या मार्गदर्शनाखाली अनिल म्हस्के सहा.पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर, ओमप्रकाश कोकाटे पोलीस निरीक्षक स्था.गु.शा., सपोनि किशोर शेरकी, आशिष ठाकुर, पोउपनि आशिष मोरखेडे व स्टॉफ, राकेश साखरकर ठाणेदार केळवद व स्टाफ, पोउपनि जगम व खापा येथील स्टाफ, पोउपनि स्वप्निल गेडाम व सावनेर येथील स्टाफ,पोलीस अधिक्षक कार्यालय सावनेर योथील मपोहवा संगिता कोवे बनं ५१९,पोशि नितेश पुसाम ब.नं २२१४ व आर.सी.पी पथक नागपूर ग्रामिण यांनी रेड केली.



## <u>मिळुन येत नसलेल्या अल्पवयीन मुलींचा घेतला शोध</u>
## <u>अनैतीक मानवी वाहतुक प्रतीबंधक कक्ष नागपुर ग्रामीणची कारवाई</u>

सन २०१९ पासुन प्रलंबीत असलेले नागपुर ग्रामीण या जिल्हयातील कलम ३६३ भादवि गुन्ह्याचा स्थानिक पोलीस ठाणे कडुन सर्वातोपरी प्रयत्न करूनही सदरचे गुन्हे उघडकीस न आल्याने, मा. पोलीस अधिक्षक साहेब नागपुर ग्रामीण ह्यांचे आदेशाने सर्व गुन्ह्यांमध्ये कलम ३७० भादवि प्रमाणे वाढ करून सदरचे गुन्हे हे अनैतीक मानवी वाहतुक प्रतीबंधक कक्ष नागपुर ग्रामीण कडे पुढील तपासकामी सोपविण्यात आले होते.

माहे जानेवारी/२०२४ पासुन ते आजपावेतो अनैतीक मानवी वाहतुक पथकाने मा. पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी आर्थीक गुन्हे शाखा, पुजा गायकवाड यांचे बहुमूल्य मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जयपालसिंह गिरासे, मपोहवा ज्योती वानखेडे, मपोहवा अर्चना कांबळे, मपोअं मालु मोहीते यांनी आपले तपास कौशल्याच्या तसेच परीपुर्ण अभ्यासाने सन २०१९ पासुन प्रलंबीत असलेले एकुण ०६ गुन्हे उघडकीस आणुन, उल्लेखनीय व प्रसंशनीय कामगिरी बजावुन नागपुर ग्रामीण पोलीसांना नावलौकीक वाढविले आहे.

१) पोस्टे भिवापुर अप. क्र. ६२०/२०१९ कलम ३६३, ३७० भादवि या गुन्ह्यात गोपनीय माहीतीचे आधारे पिडीत अपह्वत मुलगी आणि आरोपी यांचा शोध करून हैद्राबाद येथे दोघेही मिळुन आल्याने, त्यांना कायदेशीर ताब्यात घेवुन सबंधीत पोलीस ठाणेला आणुन पुढील कार्यवाही करीता ताब्यात देण्यात आले.

२) पोस्टे मौदा अप. क्र. १९०/२०२२ कलम ३६३, ३७० भादवि या गुन्ह्यात गोपनीय माहीतीचे आधारे पिडीत अपह्वत मुलगी आणि आरोपी यांचा शोध उत्तरप्रदेश राहत असुन, ते दोघेही नागपुर येथे आल्याचे माहीतीवरून त्यांना कायदेशीर ताब्यात घेवुन सबंधीत पोलीस ठाणेला आणुन पुढील कार्यवाही करीता ताब्यात देण्यात आले.

३) पोस्टे कन्हान अप. क्र. २०४/२०२२ कलम ३६३, ३७० भादवि या गुन्ह्यात गोपनीय माहीतीचे आधारे पिडीत अपह्वत मुलगी आणि आरोपी यांचा शोध करून बालाघाट शिवनी (मध्यप्रदेश) येथे दोघेही मिळुन आल्याने, त्यांना कायदेशीर ताब्यात घेवुन सबंधीत पोलीस ठाणेला आणुन पुढील कार्यवाही करीता ताब्यात देण्यात आले.

४) पोस्टे कोंढाळी अप. क्र. ३७८/२०२२ या गुन्ह्यात गोपनीय माहीतीचे आधारे यातील आरोपी व पिडीत मुलीचा शोध जयंती नगर नागपुर येथे दोघेही मिळुन आल्याने, त्यांना कायदेशीर ताब्यात घेवुन सबंधीत पोलीस ठाणेला आणुन पुढील कार्यवाही करीता ताब्यात देण्यात आले.

५) पोस्टे पारशिवनी अप.क्र. ३९/२०२३ या गुन्ह्यात गोपनीय माहीतीचे आधारे यातील आरोपी व पिडीत मुलीचा शोध उप्पलवाडी नागपुर येथे दोघेही मिळुन आल्याने, त्यांना कायदेशीर तांब्यात घेवुन सबंधीत पोलीस ठाणेला आणुन पुढील कार्यवाही करीता ताब्यात देण्यात आले.

६) पोस्टे नरखेड अप.क्र. ५०२/२०२३ कलम ३६३, ३७० भादवि या गुन्ह्यात गोपनीय माहीतीचे आधारे पिडीत अपह्वत मुलगी आणि आरोपी यांचा शोध करून मटकाझरी, तालुका कुही येथे आरोपीचे मामाकडे पांडुरंग सोंडे यांचे घरी राहत असल्याचे गोपनीय माहीतीवरून दोघेही मिळुन आल्याने, त्यांना कायदेशीर ताब्यात घेवुन सबंधीत पोलीस ठाणेला आणुन पुढील कार्यवाही करीता ताब्यात देण्यात आले.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**